आकाशवाणी नागपूर,
(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार, दिनांक ०३ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

1. **जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **कुठलाही गरीब रुग्ण उपचारासाठी प्रतीक्षायादीत राहणार नाही, याची काळजी घ्या, अशी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची एम्स नागपूरच्या अधिकाऱ्यांना सूचना.**
3. **पॅरिस ऑलिम्पिकमधे आज नेमबाज मनू भाकरचं तिसरं पदक थोडक्यात हुकल तर काल बॅडमिंटन पुरुष एकेरीत लक्ष्य सेननं उपांत्य फेरी गाठली.**

आणि

4. देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आरोपांचे अनिल देशमुख यांनी केले खंडन; खंडणी प्रकरणात जे जे बाहेर येईल त्या सर्वांची चौकशी होईल असे देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण.

****

कृषि अर्थशास्त्रज्ञ संमेलन

जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं ३२ व्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ञ परिषदेचं उद्‌घाटन मोडी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. सरकार कृषी क्षेत्रात विविध सुधारणा करत असून यामागे शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्याचा हेतू आहे, सरकारच्या आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी कृषिक्षेत्र आहे, असं ते म्हणाले. तृणधान्यं, दूध, डाळी आणि मसाल्यांचं सर्वात जास्त उत्पादन भारतात होत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. देशात रसायनमुक्त, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात शाश्वत शेतीवर मोठा भर देण्यात आल्याचंही पंतप्रधानांनी सांगितलं. देशात कृषिक्षेत्रातलं संशोधन आणि शिक्षणासाठी चांगलं वातावरण असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यंदा या परिषदेत सुमारे ७५ देशांच्या एक हजारापेक्षा जास्त प्रतिनिधींनी भाग घेतला आहे. यावर्षीची परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेने परिवर्तन’ अशी आहे.

सर्वोच्च न्यायालय लोक अदालत

सर्वोच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या लोक अदालतीमध्ये एक हजारांहून अधिक खटले निकाली निघाले आहेत. याअंतर्गत दिवाणी, भूसंपादन आणि विवाहविषयक अनेक खटले मार्गी लागले, अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाचं ७५ वं स्थापना वर्ष साजरं करण्यासाठी न्यायालयानं हाती घेतलेल्या विशेष लोक अदालत उपक्रमाचा आज अंतिम दिन असून या निमित्त आयोजित कार्यक्रमात मेघवाल बोलत होते. या लोक अदालतीमुळे सर्वांना सुलभ, जलद आणि कमी खर्चिक न्याय मिळतो.

'हर घर तिरंगा'

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी देशवासियांना आवाहन केले आहे की, त्यांनी 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत **9** ते **15** ऑगस्ट या दिवसांमध्ये घरोघरी तिरंगा ध्वज फडकवावा आणि **harghartiranga.com** या संकेतस्थळावर आपले सेल्फी अपलोड करावेत.

नितीन गडकरी-एम्स

विदर्भासह आसपासच्या प्रदेशातील गरीब रुग्णांना सर्व प्रकारचे उपचार मिळावेत, त्यांचे हाल होऊ नयेत म्हणून आपण नागपूरमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था एम्स आणली आहे. त्यामुळे कुठलाही गरीब रुग्ण उपचारासाठी प्रतीक्षा यादीत राहणार नाही, याची पूर्ण काळजी घ्या, अशी सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज एम्सच्या अधिकाऱ्यांना दिल्या. गडकरी यांनी एम्सच्या कामाचा आणि यंत्रणेच्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला. यावेळी एम्सचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विकास महात्मे, संचालक डॉ. प्रशांत जोशी आणि डॉक्टरांची उपस्थिती होती. 'कोणत्या उपचारांसाठी आणि शस्त्रक्रियांसाठी तसेच तपासण्यांसाठी प्रतीक्षा यादी आहे आणि त्याचं कारण काय आहे, याचा शोध घ्या. अशी परिस्थिती एम्ससारख्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये कधीच उद्भवणार नाही, याची विशेष काळजी घ्या, अशी सूचना गडकरी यांनी केली. भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नागपूर या जिल्ह्यांमध्ये सिकलसेल आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे एम्समध्ये त्यांचा उपचार झालाच पाहिजे, असा आग्रह गडकरी यांनी व्यक्त केला.

डेंग्यू-अपूर्व चंद्रा

डेंग्यूमुळे होणाऱ्या मृत्यूंचं प्रमाण १९९६ नंतर तीन टक्क्यांनी घटलं आणि हा मृत्यूदर २०२३ मध्ये शून्य पूर्णांक १७ टक्के इतका झाला असल्याचं केंद्रीय आरोग्य विभागाचे

सचिव अपूर्व चंद्रा यांनी म्हटलं आहे. देशातील नऊ सर्वाधिक प्रभावित राज्यांत डेंग्यूच्या प्रतिबंधासाठी आरोग्य सुविधांचा आढावा चंद्रा यांनी काल घेतला. यावेळी त्यांनी डेंग्यूवर नियंत्रण आणि प्रतिबंधासाठी राज्यसरकार आणि नगरपालिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं.

अवयवदान

आजच्या राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त नागपूरच्या शासकीय महाविद्यालयातर्फे आज सकाळी अवयवदान रॅलीचं आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात मेडीकलच्या मुख्य गेटपासून जीएमसी नागपूरचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी हिरवी झेंडी दाखवून केली. अवयवदानाच्या महत्त्वाविषयी जागरुकता निर्माण करणे आणि समाजाला या जीवनरक्षक कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे हा या रॅलीचा उद्देश होता.

मनु भाकर / लक्ष्य सेन

पॅरिस ऑलिम्पिकमधे आज नेमबाज मनू भाकरचं तिसरं पदक थोडक्यात हुकलं. महिलांच्या २५ मीटर पिस्टल प्रकारात ती चौथ्या स्थानावर राहिली. या स्पर्धेत तिनं दोन पदकांची कमाई केली आहे. स्पर्धेत काल बॅडमिंटन पुरुष एकेरीत लक्ष्य सेननं उपांत्य फेरी गाठली. पुरुष हॉकी संघानं ५२ वर्षांनी ऑस्ट्रेलियाच्या संघावर ३-२ अशी मात केली. त्यांचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना उद्या ग्रेट ब्रिटनशी होणार आहे. नेत्रा कुमनन नौकानयन स्पर्धेत सहभागी होईल, तर पुरुषांच्या गटात नौकानयनपटू विष्णू सर्वनन, गोल्फमध्ये शुभंकर शर्मा आणि गगनजीत कौर, तर मुष्टियुद्ध स्पर्धेत निशांत देव पदकांच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी प्रयत्नशील राहतील. दरम्यान, ऑलिम्पिकच्या आठव्या दिवशी तिरंदाजी, मुष्टियुद्ध, नौकानयन, गोल्फ या स्पर्धांमध्ये आज भारतीय महिला खेळाडू सहभागी होतील.

अनिल देशमुख

तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांचे पुत्र आदित्य ठाकरे यांना अटक करण्याचं प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आपल्यावर दबाव टाकला, असा आरोप अनिल देशमुख यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. दरम्यान, फडणवीस यांनी उच्च न्यायालयानं सचिन वाजे याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर नोंदवलेलं निरीक्षण ध्यानात न घेताच आरोप केला आहे, अशी प्रतिक्रिया अनिल देशमुख यांनी दिली आहे. आपल्या विरोधातल्या आरोपांवर स्पष्टीकरण

देण्यासाठी सचिन वाजेसारख्या अपराधी व्यक्तीची मदत फडणवीस यांना का घ्यावी लागते? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, तळोजा कारागृहात असलेल्या बडतर्फ अधिकारी सचिन वाजे यांनी काल प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले होते की अनिल देशमुख हे खंडणीसाठी त्यांच्या सहाय्यकामार्फत पैसे मागत होते. हे केंद्रीय अन्वेषण ब्युरोच्या तपासात देखील समोर आलं आहे. त्या संदर्भातील पत्र देखील आपण फडणवीसांना लिहिलं होतं. आज एका कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं की असे कुठले पत्र आपल्याला आले असल्याचे सध्या माहीत नाही. त्याची आपण मुंबईत गेल्यानंतर शहानिशा करू. कारण गेले दोन दिवस आपण नागपुरात होतो आणि या प्रकरणात गुंतलेल्या सर्वांची चौकशी होईल, असे देखील त्यांनी स्पष्ट केलं.

माजी विद्यार्थी मेळावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समारोप समारोहानिमित्त सिव्हिल लाईन्स येथील डॉ.वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात आज सकाळी माजी विद्यार्थी मेळावा आयोजिण्यात आला होता. या कार्यक्रमाला संबोधित करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या विद्यार्थी जीवनातील विद्यापीठातील आठवणींना उजाळा दिला. या विद्यापीठाने अनेक विद्यार्थी दिले, ज्यांनी आपापल्या क्षेत्रात लौकिक प्राप्त केला, असे ते म्हणाले. या वेळी विद्यापीठाच्या आजी माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यात प्रसिद्ध होमियोपॅथी डॉक्टर विलास डांगरे, हिंदी दैनिकाचे विनोद माहेश्वरी, प्रसिद्ध साहित्यिक वि स जोग यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता.

क्रीडा केंद्राचे भूमिपूजन

नागपूरच्या विभागीय क्रीडा संकुल मानकापूर इथल्या परिसरात नागपूर स्पोर्ट्स हब अर्थात क्रीडा केंद्राचे भूमिपूजन आज सायंकाळी ६.३० वाजता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सुमारे ६८३ कोटी रुपये किमतीच्या या स्पोर्ट्स हबद्वारे क्रीडापटूंना अव्वल दर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आरोग्य तपासणी

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने चांदूर स्टेशनवर वैद्यकीय तपासणी शिबिराचं आयोजन केलं. काल झालेल्या या शिबिरात तिकीट तपासणी स्टाफ, सहाय्यक, ट्रॅक मेंटेनर, तंत्रज्ञ, स्टेशन मास्तर आणि विभाग अभियंता यांच्यासह नागपूर विभागातील विविध क्षेत्रीय कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांसाठी प्रतिबंधात्मक आरोग्य उपायांची खात्री करण्यासाठी वैद्यकीय तपासणीही यावेळी करण्यात आली.

दत्ताजी डिडोळकर जन्मशताब्दी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापना काळातील अग्रणी कार्यकर्ते, जुन्या मद्रास प्रांतातील संघप्रचारक, कन्याकुमारी स्थित विवेकानंद शिला स्मारकाचे प्रेरणास्रोत दत्ताजी डिडोळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त गेल्या वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. जन्मशताब्दी वर्षाचा समारोपीय कार्यक्रम बुधवार, दि.**7** ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती दत्ताजी डिडोळकर जन्मशताब्दी समारोह समितीचे सचिव माजी खासदार आणि उद्योजक अजय संचेती यांनी पत्रकार परिषदेत दिली. समितीच्या वतीने रेशीमबाग येथील कवी सुरेश भट सभागृहात सायंकाळी 6 वाजता आयोजित या कार्यक्रमात सरसंघचालक डॉ.मोहन भागवत, अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ मठाचे स्वामी जितेंद्रनाथ महाराज, अभाविपचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजशरण शाही यांची उपस्थिती राहील. तर अध्यक्षस्थानी जन्मशताब्दी समारोह समितीचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहणार आहेत.

हवामान

विदर्भाच्या अमरावती, अकोला, यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये आज मध्यम ते जोरदार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अन्य जिल्ह्यात मात्र वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. दरम्यान उद्यापासून ते येत्या 7 ऑगस्ट पर्यंत विदर्भात सर्वत्र वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचं हवामान खात्याने कळवलं आहे. येत्या काही तासात विदर्भातील नागपूर, अमरावती, भंडारा, अकोला, बुलढाणा इथं काही ठिकाणी आणि वाशीम, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

****